## नवीन भुसंपादन कायदा 2013 च्या कलम 25 खाली

## अधिसूचना

जिल्हाधिकारी, परभणी यांचे कार्यालय,जिल्हा परभणी .

**क्रमांक 2015/भुसंपादन/सं.क्र.01/2015** **दिनांक :- 26..04.2018**

**(भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-2013**

**मौ.निपाणी टाकळी ता.सेलू येथील निम्न दुधना प्रकल्प उजवा कालवाचे भुसंपादनासाठी**

भूमी संपादन अधिनियम, 2013 चे कलम 25 मध्ये नमूद केले आहे की, जिल्हाधिकारी कलम 19 अन्वये घोषणा प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून 12 महीन्याच्या कालावधीत निवाडा देईल आणि जर त्या कालावधीत निवाडा देण्यात आला नाही तर, जमीन संपादनाची संपूर्ण कार्यवाही रद्द होईल : **परंतु** त्याचे समर्थन करणारी परिस्थिती आस्तित्वात असेल तर, समुचित शासनाला 12 महीन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल, परंतु आणखी असे की, कालावधी वाढविण्याचा असा कोणताही निर्णय लेखी स्वरूपात नोंदविण्यात येईल आणि तो अधिसूचीत करण्यात येईल आणि संबंधीत प्राधिकरणाच्या वेबसाईटवर टाकण्यात येईल. (टिप : या कलमान्वये, निवाडा देण्याच्या तारखे पासून 12 महीन्यांच्या आत जिल्हाधिकाऱ्याने निवाडा दिला नाही तर, जमीन संपादनाची संपूर्ण कार्यवाही रद्द होईल, तसेच समर्थनिय परिस्थितीत 12 महीन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार समुचित शासनाला असून कालावधी वाढविण्याचा असा निर्णय नोंदविणे व प्रसिध्द करणे आवश्यक आहे अशी देखील तरतुद केली आहे.)

मौ.निपाणी टाकळी ता.सेलू येथील भूसंपादन प्रकरणात सदय:स्थितीत जर हा निवाडा रद्द केला तर सदर प्रकरणात पुन्हा मोजणी, कलम 11 ची अधिसूचना प्रसिध्दी, कलम 19 ची अधिसूचना प्रसिध्दी, प्रारूप निवाडा, अंतीम निवाडा ही कार्यवाही करण्यासाठी वेळ जाऊन शासनाचे मोठे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच संबंधीत भूधारकही वारंवार प्रकरणातील मावेजा बाबत विचारणा करत असल्याने या परिस्थितीत निवाडा रद्द केल्यास पुन्हा अधिक विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. राष्ट्रीय महामार्गाचे प्रकरणात याआधी एक वेळेस 3(अे) ची अधिसूचना प्रसिध्द झाल्यानंतर संबंधीत यंत्रणे मार्फत एक वर्षाचे आत 3(डी) प्रसिध्द न झाल्याने भूसंपादनाची कार्यवाही व्यपगत होऊन एक वर्षाचा विलंब झालेला आहे.

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम-25 अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, या नात्याने प्रकरणात 12 महीन्याच्या कालवधीत वाढ करण्याचा असलेला अधिकार वापरून खालील प्रकरणातील अंतीम निवाडा पारीत करण्यास वाढीव मुदत मंजुर करत आहे.

awards

**अनुसूची - एक** **जमिनीचे वर्णन**

गाव- **मौ. निपाणी टाकळी** तालुका **सेलू** जिल्हा - **परभणी**

**निम्न दुधना प्रकल्प, उजवा कालावा चे भूसंपादन**

| **अ.क्र** | **भूमापन किंवा गट क्रमांक** | **अंदाजित क्षेत्र (हेक्टर/आर मध्ये)** |
|---|---|---|
| 1 | 22 | 2.79 |
| | **एकूण क्षेत्र-** | **2.79** |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :- निम्न दुधना प्रकल्प, उजवा कालावा** साठी भुसंपादन

**प्रकल्प कार्याचे वर्णन :- निम्न दुधना प्रकल्प, उजवा कालावा चे भूसंपादन** या सार्वजनिक कामाचे प्रयोजनार्थ.

**समाजाला मिळणारे लाभ :-** सार्वजनिक हितार्थ

**अनुसूची - तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :-** विस्थापनाची आवश्यकता नाही.
सबब माहिती निरंक

**अनुसूची - चार**

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश )**

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश. दिनांक 13 मार्च 2015 चे राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क्रमांक संकिर्ण 01/2015/प्र.क्र.3/अ-2, नुसार उक्त अधिनियमाचे कलम-10 क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देण्यात आलेली आहे.

**अनुसूची - पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

**(अ)** प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम :- प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही.

**(ब)** प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता:- :- निरंक

**(क)** ज्या अधिसूचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील. :- निरंक.

**टिप :-** उक्त जमिनीच्या आराखडयाचे उपजिल्हाधिकारी भूसंपादन परभणी जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**दिनांक :-** 26 **/04/2018**

**ठिकाण :- परभणी**

**(पी.शिव शंकर)**
**जिल्हाधिकारी परभणी तथा**
**समुचित शासन**